International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 Sept – Oct 2022

# कर्मयोगी आदरणीय सि.ना.आलुरे गुरुजींचे शैक्षणिक कार्यातील योगदान

कांबळे डी.एस.
सहाय्यक प्राध्यापक (भूगोल विभाग) जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर.
*Corresponding Author-* कांबळे डी.एस.
Email-kambleds19@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7276839*

**सारांश :—**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.समाज जीवनांच्या गरजा आशा—आकांक्षा आणि उद्दिष्टये यांच्याशी शिक्षणाचा फार जवळचा संबंध आहे. समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक विचार प्रवाहाना योग्य वळण देण्याचे काम शिक्षणाचे आहे. मानवाची अस्मिता व अस्तित्व व्यवस्थीत ठेवून त्याला स्वाभिमानाने आणि सुखाने जगण्याचा मार्ग दाखविणे हे शिक्षणाचे महत्वाचे कार्य आहे. समाजाची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी समाजातील तळा गाळातील सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे. पण भारतीय समाजात शिक्षण घेण्याचा अधिकार मुठभर लोकांना होता.त्यामुळे बहुजन समजातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होता.

**प्रस्तावना :—**

सर्व प्राणी विश्वात मानव हा अधिक बुध्दिमान समजला जातो. कारण त्याने आपल्या बुध्दी सामर्थ्याने नवे विश्व निर्माण केले आहे. विश्वात तोच एकमेव बोलणारा, सखोल विचार करणारा प्राणी पूर्वी भटक्या अवस्थेत असणारा मनुष्य हा आज आपल्या बुध्दी सामर्थ्यांच्या जोरावर आजचे तंत्रज्ञान युग निर्माण केले आहे. शिक्षण ही एक नैसर्गिक व स्वयंस्फूर्त निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. व्यक्तीच्या शिक्षणाची कुटूंब हीच प्रारंभिक पाठशाला आहे, असे म्हटले जाते. भारतीय समाज व्यवस्थेत मुठभर लोक शिक्षण घेऊन सुखाची फळे चाकतात. तेव्हा समाजातील ढिगभर लोक शिक्षणा अभावी दु:खात पिचत पडत असत. त्यामुळे समाजात विषमता पसरत असे त्यामुळे समाजाची प्रगती थांबते त्यासाठी राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रातील परिवर्तनासाठी शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन होणे गरजेचे आहे. शिक्षणाचा हक्क ग्रामीण भागात राहणा—या असंख्य लोकांना अज्ञानाच्या शृंखलेतून मुक्त करणारे कर्मयोगी आदरणीय सि.ना.आलुरे गुरुजी होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाची उंची शब्दात व्यक्त करता येणार नाही. या शोध निबंधातून आदरणीय सि.ना. आलुरे गुरुजी यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**शिक्षणाचा अर्थ :—**

शिक्षणास इंग्रजीमध्ये एज्युकेशन (Education) म्हटले जाते. एज्युकेशन हा शब्द लॅटिन भाषेतील एज्युकेअर (Educator) या शब्दापासून बनला आहे आणि या शब्दाचा अर्थ विकसित करणे, वाढविणे आणि संवर्धन करणे असा आहे. याचा दुसरा अर्थ जागृत करणे, चालना देणे असा देखील आहे.

**व्याख्या :—**

१) सर पर्सिनन :— शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्वाचा परिपूर्ण विकास असून त्याद्वारे आपल्या सर्वोत्तम क्षमतेद्वारे मानवी जीवनाकरिता मौलिक योगदान करु शकते.

२) महात्मा फुले :— समाज परिवर्तनाचे हुकमी हत्यार म्हणजे शिक्षण होय.

३) जॉन रुसो — सदृढ शरीरात सुदृढ मन असणारी माणसे निर्माण करणे हे शिक्षणाचे साध्य होय.

**उद्येश :—**

१. आदरणीय सि.ना.आलूरे गुरुजी यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

२. मानवी जीवनात शिक्षणाचे महत्व जाणून घेणे.

३.तुळजापूर तालुक्याच्या विकासात शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर या संस्थेने केलेल्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

**माहिती स्त्राते व संशोधन पध्दती:—**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, जर्नल मासिके वर्तमानपत्रे व इंटरनेटचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन :—**

ज्ञानाचा दिवा खेडयापासून वाडया वस्त्यातील लोकांच्या मनामध्ये चितावणारे, इथल्या मना—मनामध्ये स्वाभिमान फुलविणारे देव दगडात नसतो तर माणसात असतो हे हेरुन इथल्या माणसांमध्ये माणुसकी पेरणारे शिक्षणमहर्षी आदरणीय सि.ना.आलुरे गुरुजी होय. मराठवाडा हा दगडधोंडयांच्या अंचन,कांचन कडया कपारिचा विभाग आहे. भले रत्नांच्या खाणी या मातीत नसतील पण पृथ्वी मातीची लाख मोलाची नवरत्न या मातीतच जन्माला आली आणि त्यापैकी एक म्हणजे आपले बाबा, आदरणीय सि.ना. आलुरे गुरुजी होय.

६ सप्टेंबर १९३२ रोजी अणदूर या छोटयाशा खेडेगावात शेतकरी कुटूंबात लोकमाता आक्का उर्फ लक्ष्मीबाई या मातेच्या पोटी गुरुजींचा जन्म झाला.

वडीलाचे नाव नागप्पा आलुरे हे होते. महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून 'अणदूरचा खंडोबा' अशी वेगळी ओळख असणारे गाव म्हणजे अणदूर. आदरणीय गुरुजींचे प्राथमिक शिक्षपण (१ली ते ४ थी) अणदूर पुढील शिक्षण उर्दू माध्यमातून १० वी पर्यतचे नळदूर्ग येथे पूर्ण केले तसेच महाविद्यालयीन शिक्षण दयानंद कॉलेज, सोलापूर येथून पूर्ण केले.

आलुरे गुरुजींनी आपल्या कार्याची सुरुवात शिक्षकी पेशापासून केली.१९५७ पासून सरकारी प्राथमिक शाळा पाडाळी, ता.पाटोदा, जि.बीड येथून त्यांच्या सेवेचा प्रारंभ झाला. याच वर्षी गुरुजींचा विवाह शांता काकीशी झाला. १९५८ ते १९६० या काळात ते शासकीय हायस्कुल, रेणापुर, जि.लातूर येथे कार्यरत होते. त्यानंतर गावातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी आलुरे गुरुजींना आपल्या अणदूर गावी शिक्षणसंस्था काढायची आहे. आपण गावी यावे, असा आग्रह, तेव्हा गुरुजीनी सरकारी नोकरी सोडून दिली. १० जुलै १९५९ रोजी शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर या संस्थेची स्थापना केली. आणि प.ना. देशमुख विद्यालय, सुरु करुन शैक्षणिक कार्याला सुरुवात केली. १९६२ मध्ये नवीन कार्यकारी मंडळात सचिव म्हणून गुरुजींनी जबाबदारी स्वीकारली. १९६४ च्या शैक्षणिक वर्षाखेरीस त्यावेळेचे मुख्याध्यापक कै.एम. जी.कुलकर्णी यानी भावाच्या शिक्षणासाठी नोकरी सोडली आणि ते सोलापूरला गेले. त्यामुळे सेवा जेष्ठतेनुसार आदरणीय सि.ना.आलुरे गुरुजींनी जून १९६४ मध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी स्वीकारली.

१९६५ मध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांच्या स्मरणार्थ प्रथम स्मृती दिना दिवशी श्री.प.ना.देशमुख विद्यालयाचे नामांतर जवाहर विद्यालय, अणदूर असे करण्यात आले. आदरणीय गुरुजींनी जातिभेद व अस्पृश्यता यांच्या विरोधात बंड पुकारले.त्यांनी बहुजन समाजाचा खरा उध्दार सार्वत्रिक शिक्षण प्रसारा खेरीज होणार नाही, हे लक्षात घेतले म्हणतात ना एखाद्याच्या आयुष्यामध्ये एखादा असा क्षण येतो की, त्याक्षणी संपूर्ण आयुष्यच बदलून जाते आणि तो खरा त्याक्षणी क्षण असतो.

**'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली**
**निती विना गती गेली, गतिविना वित्त गेले**
**'वित्ता विना शुद्र खचले इतके अनर्थ एका**
**अविद्येने केले'**

असे महात्मा फुले म्हणतात अविद्येने अनर्थ होतात म्हणून आदरणीय गुरुजीना ही अविद्या नष्ट करुन समाजाला नीती, मती व गती द्यावयाची होती? सर्वसामान्य बहुजन समाजामध्ये शिक्षणाची गंगोत्री पोहचवून त्यानी बहुजन समाजाचा खरा उध्दार सार्वत्रिक शिक्षण प्रसारा खेरीज होणार नाही हे लक्षात घेतले. त्याना आर्थिक आणि समाजात माना उंच वर करुन जगता यावे हा गुरुजींचा उद्येश होता. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार हेच गुरुजींनी आपल्या जीवनाचे ध्येय ठरविले. बहुजनांच्या झोपडी—झोपडीत आणि खोपडी खोपडी पर्यंत पोंहचविण्याचे आदर्श कार्य केले. ग्रामीण भागात शिक्षणसंस्था चालविणे, कठिण आणि त्याही पेक्षा वस्तीगृह चालविणे हे तर महाकठिण यावेळी गुरुजीना शांताकाकीची खूप मदत झाली. विद्यार्थ्यांच्या खाण्यापिण्याची व राहण्याची सोय करणे हे एक प्रकारे अग्निदिव्यच होते. हे वृत्त गुरुजीने स्वीकारले होते.

एखाद्या लहानशा रोपट्याचें प्रचंड अशा वटवृक्षात रुपांतर व्हावे तसा या संस्थेचा विस्तार व नावलौकिक झाला.

आज या संस्थेच्या विविध शाखा आहेत त्या पुढीलप्रमाणे—

| अ.क्र. | संस्थेचा कार्य विस्तार | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १. | जवाहर विद्यालय, अणदूर | १९५९ |
| २. | श्री बसवेश्वर विद्यार्थी वस्तीगृह, अणदूर | १९६१ |
| ३. | बापूजी बालक मंदिर,अणदूर | १९६९ |
| ४. | कै.फूलचंद राजाराम कस्तुरे विद्यार्थी वस्तीगृह, अणदूर | १९७० |
| ५. | कन्या वस्तीगृह, अणदूर | १९७५ |
| ६. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालक मंदिर, अणदूर | १९७७ |
| ७. | श्री बसवेश्वर फ्लोअर मील, अणदूर | १९७९ |
| ८. | श्री कुलस्वामिनी विद्यार्थी वसतिगृह,तुळजापूर | १९८२ |
| ९. | श्री कुलस्वामिनी विद्यालय, तुळजापूर | १९८३ |
| १०. | स्वातंत्र्य सैनिक कै.विरभद्रप्पा स्वामी विद्यार्थी वस्तिगृह, तुळजापूर | १९८३ |
| ११. | महात्मा ज्योतिबा फुले रात्रशाळा,तुळजापूर | १९८४ |
| १२. | जवाहर उच्च माध्यमिक विद्यालय,अणदूर | १९८४ |
| १३. | श्री कुलस्वामिनी प्राथमिक विद्यामंदिर , तुळजापूर | १९८४ |
| १४. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कन्या वस्तीगृह, तुळजापूर | १९८५ |
| १५. | लाल बहादूर शास्त्री विद्यालय,होर्टी | १९८६ |
| १६. | माध्यमिक विद्यालय,येवती | १९८६ |
| १७. | कर्मवीर भाऊराव पाटील वसतिगृह, होर्टी | १९८९ |
| १८ | साने गुरुजी विद्यालय,केशेगाव | १९९० |
| १९. | राजीव गांधी विद्यालय,हंगरगा नळ | १९९१ |

| | | |
|---|---|---|
| २०. | जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर | १९९१ |
| २१. | छत्रपती शिवाजी विद्यालय,शहापूर | १९९१ |
| २२. | संत विनोबा भावे विद्यालय,खुदावाडी | १९९२ |
| २३. | जवाहर उच्च माध्यमिक विद्यालय,अणदूर (किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम) | १९९२ |
| २४. | श्री कुलस्वामिनी बालक मंदिर, तुळजापूर | १९९२ |
| २५. | श्री बाळेश्वर विद्यालय, बारुळ | १९९९ |
| २६. | महात्मा गांधी विद्यालय, वडगाव (काटी) | २००० |
| २७. | कुलस्वामिनी उच्च माध्यमिक विद्यालय, तुळजापूर | २००१ |

अशा प्रकारे शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर या शिक्षण संस्थेचा जलद गतिने विकास झाला. मराठवाडयात,तुळजापूर तालुक्यात सर्वात मोठी ही संस्था आहे. या संस्थेच्या तुळजापूर तालुक्यात १ प्राथमिक, १ रात्रशाळा, १० माध्यमिक विद्यालय, ३ उच्च माध्यमिक विद्यालय, १ वरिष्ठ महाविद्यालय, ४ बालक मंदिर आणि ७ वसतिगृह यांचा समावेश आहे. परंतू गुरुजींनी आपल्या कार्याचा गाजावाजा केलेला नाही. जाहिरातबाजी पासून ते खूप दूर होते. आपल्या कार्याविषयी ते बोलत नव्हते. या संस्थेच्या माध्यमातून बहूजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली. त्यातुनच शिक्षणाची गंगा खेडोपाडयात पोहचली गेली. त्यातून समाज परिवर्तन होण्यास मदत झाली. स्वत:च्या हिमतीवर जबरदस्त विश्वास, श्रमावर, श्रध्दा, अन्यायाची चीड, न्यायाची चाड आणि शिक्षण विषयी नितांत प्रेम बाळगून बालाघाट रांगेच्या कुशीत असलेल्या खेडयापाडयात शिक्षणाची मुळे खोलवर रुजविले. तुळजापूर तालुक्याचे शैक्षणिक विकासात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. बालाघाट शिक्षण संस्थेच्या संस्थापकापैकी ते एक होते. या संस्थेने १९७१ साली कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदूर्ग या महाविद्यालयाची स्थापना केली. हे महाविद्यालय आज नावारुपास आली आहे.

तुळजाभवानी मंदिर ट्रस्टच्या वतीने त्यांनी १९८३ साली तुळजाभवानी ,भियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. तुळजापूर येथे नवोदय विद्यालयाच्या स्थापनेत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. जर चांगले दिवस यायचे असतील तर एकच उपाय तो म्हणजे शिक्षण होय. आदरणीय गुरुजींच्या मते शिक्षणाने बालकांचा सर्वांगीन विकास होणे आवश्यक असते. जातपात , पंथभेद यांना वाव न देता शिक्षणाद्वारे प्रगतीची संधी सर्वांना मिळाली पाहिजे तरच शिक्षणाने पिळवणूक रहित समाज निर्माण होईल. त्यांच्या मते शिक्षणाने शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण करावा. शिक्षका विषयी गुरुजी म्हणतात की, शिक्षणाचा मंडप ज्या आधारावर उभा करावयाचा तो शिक्षक सदविचारी व परिश्रमावर निष्ठा ठेवणारा पाहिजे. शिक्षक हा अत्यंत साधी राहणी पण अत्यंत पवित्र, अव्याभिचारी, थोर विचारसरणी असलेला पाहिजे. त्यांच्या मते माझा आदर्श शिक्षक हा त्या खेडयाचा आदर्श ग्रामसेवक आणि ग्रामनायक असला पाहिजे. गुरुजींना खेडयापाडयात काम करणारा केवळ डिग—यांचे ओझे सांभाळणारा नको होता. मन आणि मनगट मजबूत असलेला व बहुजन समाजाला ज्ञान देण्याच्या ध्येयाने, प्रेरित झालेला शिक्षक त्यांना हवा होता. शाळा ही पोर भरण्याची जागा नसून असंख्य मुलांना नविन विचार देण्याची जागा असते. शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर या संस्थेचे ज्ञानमंदिरे ज्ञानदानाचे काम करत आहेत.

शिक्षण क्षेत्रात आज अनेक स्वरुपामध्ये बदनाम होत आहे. आर्थिक स्त्रोत प्राप्तीचे साधन बनू पाहत आहे. या वाळवंटात गुरुजींच्या शैक्षणिक धोरणाची हिरवळ ज्ञान मंदिरातून संपन्न होत आहे. कर्मचा—यांची नेमणुक केवळ गुणवत्ता व दर्जा या स्वरुपात निवड करतात. आतापर्यंत त्यासाठी कोणाकडून ही एक रुपया देखील देणगी घेतली नाही. ही नैतिकता आज कोठे आढळते. विद्यार्थ्या विषयी गुरुजी म्हणतात की या संस्थेत शिक्षण घेणारा प्रत्येक विद्यार्थी मला ,ाचरणशील, विचारशील पाहिजे केवळ पोपट पंची करणारे विद्यार्थी मला तयार करावयाचे नाहीत. त्यांच्याकरिता ही संस्था नाही.अन्यायाला ठोकणारा एक जरी विद्यार्थी या संस्थेत राहिला तरी मी माझ्या जीवनाचे सार्थक झाले असे मी मानीन या शिक्षण संस्थेतून बाहेर पडणारा विद्यार्थी सुसंस्कृत, चारित्र्यवान व जबाबदार नागरिक बनला पाहिजे. आपला विद्यार्थी नोकरीसाठी लोकनायकाचे उंबरे झिजवणारा बेभान व बेकार तरुण नसावा. एखाद्या लहानशा रोपटयाचे प्रचंड अशा वृक्षात रुपांतर झाले त्यामुळेच आज संस्थेचा विस्तार वाढला आहे. आज या संस्थेत हजारो विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. शालांत परिक्षेला प्रत्येक वर्षी ३०० ते ३५० विद्यार्थी बसतात. ग्रामीण भागातून एवढया मोठया संस्थेचे शालांत परिक्षेस विद्यार्थी बसणारे मराठवाडयातील हे एकमेव विद्यालय आहे.

१९८१ साली कु. प्रशांत प्रभाकर काटीकर हा विद्यार्थी ७०० पैकी ६४२ गुण मिळवून मराठवाडा विभागात सर्व प्रथम , कु. महादेव दिगंबर कोकाटे हा विद्यार्थी १३ वा याच वर्षी आला. १९८२ मध्ये कु. सुहास भानूकांतराव देवसिंगकर हा विद्यार्थी १८ वा आला. १९८४ मध्ये कु.सुधीर लक्ष्मणराव सुंगीकर हा विद्यार्थी गुणवत्ता यादीत ५ वा आला तर कु. दत्तात्रय महादेव बोर्डे हा विद्यार्थी १९ वा झाला. १९९० मध्ये कु.अजय बालचंद कंदले हा विद्यार्थी ७०० पैकी ६५८ गुण मिळवून मराठवाडा विभागात सर्व प्रथम आला तर याच वर्षी कु. मनोज मोहनराव सुर्यवंशी हा १८ वा व नितीन विश्वनाथ ढेपे हा २४ वा आला. कु.धर्मनारायण विठ्ठल मिसाळे हा विद्यार्थी मराठवाडा विभागात मागासवर्गीयात सर्वप्रथम आला. या शिवाय कु.संगम्मा

महादेव नरे ही विद्यार्थीनी २० वी आली. १९९४ मध्ये शालांत परिक्षेमध्ये विद्यालयाने दैदिप्यमान यश मिळविले. विद्यालयाचा विद्यार्थी कु. सचिन जगन्नाथराव हराळकर हा ७०० पैकी ६७५ गुण मिळवून संपूर्ण महाराष्ट्रात सर्व प्रथम आला. जवाहर विद्यालय व शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक इतिहासात एक सोनेरी पानाची भर पडली. ग्रामीण भागातून शालांत परिक्षेत पहिला येण्याचा मान मिळविणारा हा एकमेव विद्यार्थी आहे. असे विद्यालयाचे अनेक विद्यार्थी मराठवाडा विभागात प्रथम आले ते गुरुजींच्या प्रेरणेमुळेच .......

जीवनात प्रयत्नाशिवाय कोणतीही गोष्य साध्य होत नाही. विद्यार्थ्याला अभ्यासाशिवाय यश नाही आणि दगडाला टाकीचे धाव सोसल्याशिवाय देवपण नाही. त्यासाठी केल्याने होते आहे रे आधी केलेचे पाहिजे. गुरुजींचे विचार एखाद्या दिपस्तंभासारखे वाटू लागतात. पददलित माणसांना हाल,आपेष्टांच्या व त्यागाच्या अग्निदिव्यातून गेल्याशिवाय मोठेपणा प्राप्त होणार नाही. आयुष्य ही शर्यत आहे. त्यात भाग घेण्याचे निमंत्रण सर्वांनाच येते. त्यात उत्तीर्ण होण्याचा निर्धार करा. ज्ञान मिळवा झगडा करा सत्याचा आधार घ्या.

दिव्याप्रमाणे स्वयंप्रकाशी व्हा ............. आदरणीय गुरुजी म्हणजेच दु:खाच्या मुलखातील प्रकाश यात्री. त्यांचा हा अग्निदिव्याचा संदेश पिडयानपिडयाना अस्मिता देणारा आहे. अशाप्रकारे आदरणीय गुरुजीनी आपल्या विचाराप्रमाणे शैक्षणिक कार्य करुन बहुजन समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. थोर विभूती काळाची गरज म्हणून जन्माला येतात व अलौकीक कार्य करुन जातात. समाजातील अज्ञान व दारिद्रय समुळ नष्ट करण्यासाठी शिक्षणासारखे पवित्र आणि प्रबळ साधन हाती घेऊन शिक्षणाची गंगा खेडयापाडयात पोहचविली. अज्ञानात खितपत पडलेल्या गोरगरिब दिनदुबळया समाजाचा उध्दार घडवून आणतात. एखाद्या व्यक्तिने शाळा महाविद्यालय किती काढली यापेक्षा त्यांनी ती कशी चालवली हे महत्वाचे असते. त्यामागची दृष्टी आणि त्यामागचा ध्येयवाद हया गोष्टी महत्वाच्या असतात. शिक्षण प्रक्रिया ही समाजपरिवर्तन व विकासाची प्रक्रिया असते. ते एक हाडाचे शिक्षक तर होतेच पण ते एक आदर्श संस्थाचालक म्हणूनही गुरुजींचे कार्य अतिशय मोलाचे आहे. अशा प्रकारे शिक्षणाचे कार्य करीत असताना या महान शिक्षण प्रणेत्याची दि.२ ऑगस्ट २०२१ रोजी प्राणज्योत मावळली. त्यांच्या पावनस्मृतीस कोटी कोटी नमन!

**संदर्भ ग्रंथ :—**


1. प्रा.डॉ.अनिता मुदकण्णा (संपा) : परीस शिक्षणमहर्षी आदरणीय सि.ना.
2. आलुरे गुरुजी गौरवग्रथं यशोदिप पब्लिकेशन, पुणे. ६ सप्टेबर २०१७
3. आदरणीय सि.ना.आलुरे गुरुजी यांचे भाषणे. २३ ऑगस्ट २०१९
4. वर्तमानपत्र — महाराष्ट्र टाइम्स दि.२ ऑगस्ट २०२१
5. वर्तमानपत्र — महाराष्ट्र टाइम्स दि.४ ऑगस्ट २०२१
6. वर्तमानपत्र दैनिक सकाळ दि.११ आक्टोबर २०२१
7. www.google.com


**कांबळे डी.एस.**